**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले तीन हुतात्मा क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना देशाची आदरांजली

- सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रयागराजच्या धर्तीवर विशेष प्राधिकरण स्थापन करुन विकास आराखडा राबवण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

- दिल्ली उच्च न्यायालयातल्या वादग्रस्त न्यायधीशांच्या चौकशीसाठी तीन सदस्यांची समिती स्थापन

**आणि**

- खेलो इंडिया पॅरागेम्स नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या सागर बाळासाहेब कातळे याला १० मीटर एअर रायफल प्रोन मिक्स्ड एसएच वन प्रकारात सुवर्णपदक

**<><><><><>**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातले तीन वीर क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना संपूर्ण देश आज श्रद्धांजली वाहत आहे. १९३१ मध्ये आजच्याच दिवशी लाहोरच्या मध्यवर्ती तुरुंगात या तीन वीरांना फाशी देण्यात आली होती. या दिवसाचं शहीद दिन म्हणून स्मरण करण्यात येतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या तिन्ही वीरांना श्रद्धांजली वाहिली आहे. समाजमाध्यमावर मोदी यांनी भगत सिंह, सुखदेव आणि राजगुरू यांच्या बलिदानाचं स्मरण केलं आहे. स्वातंत्र्य आणि न्यायासाठी या क्रांतीकारकांनी दाखवलेलं दुर्दम्य साहस आणि सर्वोच्च बलिदान देशवासियांना प्रेरित करेल, असं प्रधानमंत्री मोदी म्हणाले. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईत राजभवन इथं क्रांतिकारक हुतात्मा भगत सिंह,

राजगुरु आणि सुखदेव यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. राजभवनातले अधिकारी,आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहीद दिनानिमित्त आज सकाळी नाशिकच्या शासकीय विश्रामगृहात भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी समाजमाध्यमावर या हुतात्मा क्रांतिकारकांना अभिवादन केलं आहे. याशिवाय नवी मुंबई महानगरपालिकेत, आणि नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठातही आज शहीद क्रांतिकारकांना आदरांजली वाहण्यात आली. नवी दिल्लीत महाराष्ट्र परिचय केंद्रातही शहीदांना अभिवादन करण्यात आलं.

**<><><><>**

जगातली पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था या नात्याने भारतानं आंतरराष्ट्रीय ऊर्जा क्षेत्रात व्यापक संबंध स्थापन करायला हवेत, असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल केलं. मुंबईत एका माध्यमसंस्थेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. गेली अनेक दशकं जागतिकीकरणाच्या फायद्यांबद्दल बोलल्यानंतर जग आज औद्योगिक धोरणं, निर्यातीवर नियंत्रण आणि टॅरिफच्या युद्धासारख्या परिस्थितीशी झगडत आहे, असं ते म्हणाले.

**<><><><>**

भारताचं स्थूल देशांतर्गत उत्पादन गेल्या दहा वर्षांत १०५ टक्के वाढीच्या दरानं दुप्पट झालं आहे. देशाचा जीडीपी २०१५ मध्ये २१शे अब्ज डॉलर होता तो २०२५ मध्ये ४ हजार तीनशे अब्ज डॉलर झाला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं ही आकडेवारी जाहीर केली आहे. अमेरिका, चीन, जर्मनी आणि जपान नंतर जीडीपीच्या बाबतीत भारत आता जगातला पाचवा सर्वात मोठा देश बनला आहे. भारत लवकरच जपानला मागे टाकेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**<><><><>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं कुंभमेळ्याची पूर्वतयारी वेगाने करण्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्यात येत असून प्रयागराजच्या धर्तीवर  लवकरच कायदा करण्यात येईल अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नाशिकमध्ये आज फडणवीस यांनी कुंभमेळा तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते. कुंभमेळ्याची तयारी वेगाने सुरू असून त्र्यंबकेश्वर विकास आराखड्याला मान्यता दिली आहे. नाशिकमध्ये गोदावरी नदीच्या शुध्दीकरणासाठी खासगीकरणातून कामे करण्यात येणार असून पुढच्या महिन्यात या कामाला सुरूवात होईल असं त्यांनी सांगितलं. कुशावर्त तीर्थाचं पाणी शुध्द करण्यासाठी नगरपालिकेने तयारी केली असून त्यांना लवकर कामे करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या  समवेत कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे उपस्थित होते.

दरम्यान, यापूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्र्यंबकेश्वर येथे भेट देऊन कुशावर्ततीर्थ तसेच त्र्यंबकेश्वर मंदिराला भेट दिली. आणि विधीवत पूजा केली. तसंच विविध आखाड्यांच्या साधु महंतांशी संवाद साधला.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला यंदा शंभर वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त अनेक कार्यक्रमांचं आयोजन केल्याची माहिती संघाचे सरकार्यवाह  दत्तात्रय होसबाळे यांनी दिली आहे. बेंगळुरू इथे आज झालेल्या संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधींच्या तीन दिवसीय राष्ट्रीय सभेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. या निमित्ताने औपचारिक उत्सव आयोजित केलेला नाही, यंदा विजयादशमीपासून विविध कार्यक्रम सुरू होतील, असंही ते म्हणाले. सामाजिक सौहार्द आणि राष्ट्रीय एकता वाढवण्यासाठी स्थानिक पातळीवर जनसंपर्क कार्यक्रम आयोजित केले जातील, असंही होसबाळे यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

वेव्हज् यंग फिल्ममेकर स्पर्धेसाठी देशभरातून तेराशेपेक्षा जास्त स्पर्धकांनी नाव नोंदणी केली आहे. यातल्या वीस स्पर्धकांची अंतिम यादीत निवड झाली आहे. अमोल गुप्ते आणि चैतन्य चिंचलीकर यांचं मार्गदर्शन तसंच व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनलची मदत या स्पर्धकांना मिळाली. व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनलमधे मार्गदर्शन तसंच प्रशिक्षण दिलं जातं.

**<><><><><>**

दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी बेहिशोबी रोख रक्कम सापडल्याप्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाच्या अंतर्गत चौकशीचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर काल रात्री उशिरा प्रसिद्ध झाला. या अहवालात छायाचित्रं आणि चित्रफितींचाही समावेश आहे. या प्रकरणी न्यायमूर्ती वर्मा यांचं स्पष्टीकरण सर्वोच्च न्यायालयानं प्रसिद्ध केलं. सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी वर्मा यांच्यावरच्या आरोपांच्या चौकशीसाठी तीन सदस्यांची अंतर्गत चौकशी समिती स्थापन केली असून न्यायमूर्ती वर्मा यांना कोणतंही न्यायालयीन काम देऊ नये, असे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांना दिले आहेत.

**<><><><><>**

जीएसटी कायद्याचं पालन करताना झालेल्या चुकांमुळे करदात्याला भुर्दंड बसू नये यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने अभय योजना सुरू केली आहे. पात्र करदात्यांना येत्या ३१ मार्चपर्यंत या योजनेचा लाभ घेता येईल, असं वस्तू आणि सेवा कर विभागाने कळवलं आहे. जीएसटी कायदा नवीन असल्याने त्याचं पालन करताना किंवा करभरणा करताना करदात्यांकडून चुका झाल्यास किंवा वस्तू आणि सेवा कर संबंधित विवाद प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी या योजनेचा लाभ घेता येऊ शकेल. आवश्यक स्पष्टीकरण किंवा मदतीसाठी आपल्या नोडल, क्षेत्रीय जीएसटी

अधिकाऱ्याशी संपर्क साधावा, असं आवाहन वस्तू आणि सेवा कर विभागाने केलं आहे.

<><><><>

रासायनिक खतं, कीटकनाशकं, शेतीची  औजारं यांच्यासह शेतीसाठीच्या आवश्यक वस्तूंवरचा जीएसटी कर रद्द करावा, किंवा त्याचा परतावा द्यावा अशी मागणी अकोला जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांकडून होत आहे. कृषीसंबंधी वस्तूंवर  ५ ते २८ टक्क्यांपर्यंत जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर आकारला जातो, त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात हेक्टरी जवळपास १५ हजारांची वाढ झाली असल्याचा शेतकऱ्यांचा दावा असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><>

उन्हाळ्याच्या सुट्टीमधे प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने ३५६ उन्हाळी विशेष गाड्यांची घोषणा केली आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस– हुजूर साहेब नांदेड , मुंबई-नागपूर / करमळी / तिरुअनंतपुरम, पुणे-नागपूर आणि दौंड-कलबुर्गी दरम्यान या गाड्या चालवण्यात येणार आहेत. काही अनरक्षित गाड्या वगळता बाकीच्या गाड्यांचं आरक्षण उद्यापासून खुलं होणार आहे.

<><><><>

नवी दिल्लीत सुरू असलेल्या खेलो इंडिया पॅरागेम्सच्या नेमबाजी स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या सागर बाळासाहेब कातळे याने १० मीटर एअर रायफल प्रोन मिक्स्ड एसएच वन प्रकारात सुवर्णपदक मिळवलं आहे. मोना अग्रवाल हिने या रौप्य तर दीपक सैनी याने कांस्यपदक जिंकलं आहे. काल भारताची पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेती अवनी लेखरा हिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टँडिंग एसएच वन प्रकारात सुवर्ण पदक पटकावलं होतं.

<><><><>

इंडियन प्रिमियर लीग क्रिकेटमध्ये आणखी काही वेळात सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना रंगणार आहे. हैदराबाद इथं हा सामना साडेतीन वाजता सुरु होईल राजस्थान रॉयल्स संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. आजचा दुसरा सामना मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होईल. चेन्नई इथं सायंकाळी साडे सात वाजता हा सामना सुरू होईल. कालच्या पहिल्याच सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं कोलकाता नाईट रायडर्सचा ७ गडी राखून पराभव केला.

**<><><><><>**

अकोला महापालिका प्रशासनानं नायगाव इथल्या डम्पिंग ग्राउंड अर्थात क्षेपण भूमीवर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून वीजनिर्मिती करण्याची महापालिकेची योजना आहे. याबाबतीतला प्रस्ताव शासनाकडे लवकरच पाठवला जाईल. पालिका प्रशासनाच्या सूत्रांनी ही माहिती दिली आहे.

**<><><><><>**

सायबर फसवणुकीसाठीच्या एक नऊ तीन शून्य या हेल्पलाईनवर आलेल्या ११० तक्रारी २४ तासांच्या आत सोडवून मुंबई पोलिसांनी त्यातून सुमारे १ कोटी ४९ लाख रुपये जप्त केले आहेत. शुक्रवारी या हेल्पलाईनवर विविध प्रकारच्या सायबर फसवणुकीच्या ११० तक्रारी आल्या. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं तत्काळ संबंधित बँकांशी संपर्क साधून पैसे फसवणूक करणाऱ्यांच्या खात्यात जमा होण्याची प्रक्रिया थांबवली. अशा प्रकारची फसवणूक झाल्यास नागरिकांनी या हेल्पलाईनवर तातडीनं मदत मागावी, असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**//<><><><><>//**